# पुढील अंकात निता अधारे, गजाजन खराटे १२७ कोटीची बीड शहर अमृत पाणीपुरवठा योजना फेल सविस्तर?

MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक – दिपक थोरात



आज बार्शी नाका इमामपूर रोड बीड रेल्वे थांबा कृती समितीच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची बीड जिल्हा अधिकारी कार्यालय बीड येथे रेल्वे कृती समितीने भेट घेऊन बार्शी नाका इमामपूर रोड वर रेल्वे थांबा झालाच पाहिजे असे निवेदन देऊन चर्चा करताना रेल्वे थांबा कृती समिती बीड

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१४४ | शनिवार दि.०८ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -144 | SATURDAY DT.08 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीडचे पालकमंत्री अजित पवार मराठा, वंजारी वादात अधिकाऱ्यांची जात पाहूण विरोध करणे कितपत योग्य? अजित दादांनी पुढाकार घेणे गरजेचे










## वंजारा मराठा वादातील नेत्यांकडून आता खराटेना जलजीवनच्या कोटीच्या योजनेचा चार्ज देण्याचं षडयंत्र खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळकेकडून , जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव वाढला ?

## एक हजार आठशे कोटीच्या जलजीवन योजनेचा चार्ज घेण्यापेक्षा पाचशे कोटीच्या एमजीपीचा बट्ट्याबोळ झाला आहे तो खराटेनी लक्ष देणे गरजेचे आहे.

## बीड शहरातील १२७ कोटीच्या अमृत अटल योजनेला एमजीपी कार्यालय छत्रपती संभाजी नगरचे अधीक्षक दीपक कोळीच्या आदेशाला गजानन खराटेंकडून सुरूगं ?

## ३६६ कोटीच्या २५ योजना ग्रामीण भागामध्ये गजानन खराटे यांनी आढावा घेऊन गुत्तेदारांना पोचण्यासाठी परवानगी दिली आहे का ?

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त जातिवाद पाहायला कुठे मिळाला असेल तर तो बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्ह्यामध्ये माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अनेक घटना घडलेल्या आहेत.यामध्ये स्व संतोष देशमुख हत्या प्रकरण असेल किवा मराठा आंदोलनामध्ये राजकीय नेत्यांचे घरांची जाळपोळ असेल किंवा वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकांची आज परस्पर जातीच्या विरोधात द्वेषाचं राजकारण करणारे नेत्यांच्यामुळे आज बीड जिल्हा बदनाम होत आहे. बीडचा बिहार झाला आहे बीडचे नेते बीडला बिहार म्हणू लागले आहेत. यातच मात्र मराठा वंजारी वाद हा महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त बीड जिल्ह्यामध्ये पाहायला मिळाला आहे. यामध्ये विद्यमान मंत्री पंकजा मुंडे यांचा जातीच्या राजकारणामुळे पराभव झाला लोकसभेमध्ये पंकजा मुंडे यांचा पराभव झाल्याच्या नंतर विधान परिषदेवर जात त्यांना थेट महायुतीच्या सरकारमध्ये मंत्रीपदी मिळालं परळी मधून जातीच राजकारण व महाराष्ट्रामध्ये ज्यांना विरोध करत मराठा समाजाने जातीच्या चष्म्यातून पाहिले असेल धनंजय मुंडे, पंकजा मुंडे या बहीण भावांना मात्र आता बीड जिल्ह्यामध्ये दोन मंत्री पद मिळाल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांच्या पोटात सुडाचं राजकारण घडले यामध्ये आष्टीचे आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे. आ. संदीप क्षीरसागर आ. प्रकाश सोळंके सह अनेक नेते मंडळींनी पंकजा मुंडे धनंजय मुंडे या बहिण भावांना महाराष्ट्राच्या राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये दोन कॅबिनेट मंत्री पद मिळाली म्हणून महायुती सरकार व आपल्या पक्षाच्या वरिष्ठांवर नाराजी कासूर उगवला तर बीड जिल्ह्याला एकदाच दोन मंत्रिपद मिळाल्यामुळे हा इतिहास घडला आणि बीड जिल्ह्यामध्ये पुन्हा एकदा जातीयवादाला सुरुवात झाली यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर बीड जिल्ह्याच्या विकासाच कुणालाच पाडले नाही.

परंतु आज सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये जातीय चष्म्यातून अधिकारी कर्मचाऱ्यांना पाहणे कितपत योग्य आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनता त्रस्त झाले आहे. जातीच्या राजकारणाला व जातीय चष्म्यातून पाहणाऱ्या अनेक राजकीय नेते मंडळींना आता जनता घरचा रस्ता दाखवणार असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. यातच आता काही बाहेर जिल्ह्यातून आलेले अनेक अधिकारी हे महत्त्वाच्या खुर्ची आपल्या कार्यालयाच्या आपल्या विभागाच्या घेण्यासाठी राजकीय नेत्यांकडे आपले वशिलेबाजी करत आहेत. मग यामध्ये जातीचं राजकारण असेल किंवा आर्थिक नियोजन असेल किंवा विरोधी बाकावर बसलेल्या नेत्यांची मन धरणे असेल असं करत अनेक बाहेर जिल्ह्यातून आलेले नव्याने अधिकारी हे आता याच जातीय सलोखा बिघडण्यामध्ये व जातीच्या चष्म्यातून पाहण्याचा एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद मार्फत केंद्राची योजना असलेल्या जलजीवनची एक हजार आठशे कोटी रुपयांची हर घर जल जल जीवन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या योजनेची घोषणा केली होती ही योजना बीड जिल्ह्यामध्ये फेल गेलेली आहे यातच बीड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठ्यासह बीड जिल्ह्यामध्ये सुमारे १२७४ गावांमध्ये ही योजना चालू आहे. या योजनेचा बट्ट्याभोळ झालेलाआहे. योजनेमध्ये गुत्तेदारांना कळया यादीत सुद्धा टाकण्यामध्ये जिल्हा परिषदेचे सिओ जीवने यांनी कारवाई करत काळया यादी टाकले आहे.

तर गुत्तेदारांनी राजकीय नेत्यांनी योजना फस्त केल्यामुळे कोट्यावधी रुपयांचा घोटाळा बीड जिल्ह्यामध्ये पाहायला मिळत आहे. यातच मात्र आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग कार्यालय बीड चे तत्कालीन अभियंता के.बी चिवरेच्या कार्यकाळामध्ये ५०० कोटी रुपयांच्या योजना ह्या एमजीपी कार्यालय बीड मार्फत अमृत अटल योजना बीड शहरासाठी १२७ कोटी ची ही ही फक्त कागदावर दिसत आहे बीडकरांना त्याचा पाणी मिळालं नाही १०२ कोटी रुपये, ३६६ कोटी रुपयांच्या २५ योजना एमजीपी कार्यालय बीड मार्फत बीड जिल्ह्यामध्ये चालू आहेत गुत्तेदाराच्या घशात घालून तत्कालीन कार्यकारी अभियंता के. बी चिवरे हे सेवानिवृत्त झालेले आहेत. मराठा व वंजारी समाजाचे गुत्तेदारांमध्ये आता तू बडा क्या मै बडाची अशी लढाई सुरू झालेली आहे यामध्ये सामाजिक कार्यकर्ते असतील राजकीय नेते असतील मंत्री आमदार खासदार असतील यामध्ये आता मराठा वंजारी वाद पाहायला मिळालेला आहे परंतु आता बीड जिल्ह्यामध्ये अनेक भागांमधून वेगवेगळ्या महत्त्वाच्या कार्यालयाचे खुर्च्या या मराठा समाजातील अधिकारी नेते हे वंजारी समाजाच्या अधिकाऱ्यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर हाकलण्याच्या तयारीत आहेत त्यामुळे आता बीड जिल्हा जलजीवनच्या १०८०० कोटीच्या खुर्चीवर बसलेले मुकुंद आंधळे यांना उचलून त्यांच्या जागी आता अकोला येथून आलेले प्रभारी पद सांभाळत असलेले गजानन खराटे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीड चा व जल जीवन जिल्हा परिषद विभागाचा मुकुंद आंधळे यांचा पदभार काढून त्यांच्या जागी स्वतःच्या वशिला लावण्यामध्ये सध्या व्यस्त आहेत परंतु त्यांनी बीडच्या अमृत अटल योजना व बीड जिल्ह्यातील ३६६ कोटीच्या २५ योजना ह्या कशा पूर्ण होतील याकडे लक्ष दिले पाहिजे जातीच्या राजकारणामध्ये गजानन खराटे यांनी न पडलेले बरे कारण मराठा वंजारी वादामध्ये बाहेर जिल्ह्यातील अधिकारी हे स्वतःच्या फायद्यासाठी जल जीवन चे दोन्ही चार्ज घेण्यासाठी गजानन खराट्याची धडपड पाहायला मिळत आहे परंतु पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये जात जर गजानन खराटे यांनी मुकुंद आंधळींच्या खुर्चीवर जाऊन बसण्याचा प्रयत्न केला तर खराटे हे अडचणीत येण्याची शक्यता असल्याची चर्चा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय विभाग बीड व जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागातील अधिकारी कर्मचारी व गुत्तेदार यांच्यामध्ये चर्चा जोर धरू लागली आहे खराटे हे मूळचे बाहेर जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांना बीडची राजकारणामध्ये प न पडलेले बरे अशी ही चर्चा जिल्हा परिषद विभागातील एका सेवानिवृत्त व चौकशीच्या फेऱ्यांमध्ये अडकलेल्या एका शाखा अभियंत्याने सांगितले आहे तो शाखा अभियंता दारूच्या नशेमध्ये तर होत मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये सुद्धा काम करत आहे आम्हीच गजानन खराटेला तो चार्ज देणार असल्याचेही दारूच्या नशेत त्या शाखा अभियंत्याने सांगितले आहे तो शाखा अभियंता परभणी बीडला वादग्रस्त ठरलेला आहे त्याच्यावरती सध्या चौकशीचा ससे मिरा चालू असताना मुकुंद आंधळेला हटवून त्याच्याजागी खराटेला पुढची देऊन स्वतःचा फायदा करत आहे यामध्ये खासदार बजरंग सोनवणे सुरेश धस आमदार संदीप क्षीरसागर हे जिल्हाधिकारी यांच्यावरती दबाव आणत असल्याचे दबक्या आवाजामध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये चर्चा ऐकायला पहा मिळत आहे त्यामुळे गजानन खराटे आता नेमकी मुकुंद आधळे ची खुर्ची मिळवतात का याकडे आता जिल्ह्यातील राजकीय नेते व गुत्तेदार यांचे लक्ष लागलेले आहे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत यांनी बीड जिल्ह्यामध्ये अधिकाऱ्यांमध्ये मराठा वंजारी वाद पाहणे हे कितपत योग्य आहे अधिकाऱ्यांना जातीच्या चष्म्यातून पाहणे म्हणजे राजकारण आहे हे बीड जिल्ह्याचे अजित दादा आपण याकडे लक्ष देणे गरजेचे आहे मुकुंद आधळे ना हटवून त्यांच्या जागी गजानन खराटेला चार्ज देण्याचे षडयंत्र खासदार बजरंग सोनवणे संदीप क्षीरसागर सुरेश धस प्रकाश सोळंके यांनी योजना आखल्यामुळे आता बीड जिल्ह्यामध्ये मराठा वंजारी वादामध्ये आता पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांनी मराठा असो वंजारी असो किंवा अन्य जातीचे अधिकारी आणलले असो यांना हटवून त्यांच्या जागी आपल्या मर्जीतील अधिकारी देण्यासाठी आपल्या च पक्षातील सरकार मधील व विरोधी आमदार हे आता उपमुख्यमंत्री अजित पवारांनाच चॅलेंज करू लागला आहे का असा सवाल आता नागरिकांतून उपस्थित होत आहे.

बीड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय मार्फत १२७ कोटी ची योजना ही बीड शहरातील अमृत अटल योजना ही चालू होती परंतु तत्कालीन कार्यकारी अभियंता केबी चिवडे यांच्या कार्यकाळामध्ये प्रगती कंट्रक्शन या गुत्तेदाराला १०२ कोटी रुपये दिलेले आहेत त्या १०२ कोटी रुपये दिल्यानंतर गुत्तेदारांनी बोरी विस्तारा घेऊन पसार झालेला आहे उर्वरित काम न करण्याचा गुत्तेदार सांगत असताना यामध्ये विद्यमान एमजीपी कार्यालयाचे काउंटंट बीएस ठाकूर हे मे प्रगती कंट्रक्शन याला सांगत आहेत की तुम्ही १०२ कोटी रुपयांची बिल घेतलेले आहेत व उर्वरित २५ कोटीचे बिल हे कार्यकारी प्रभारी अधिकारी गजानन खराटे यांच्याकडून गुत्तेदाराला काढून देऊ पण यश ठाकूर हे गजानन खराटे नाव पुढे करत टक्केवारीची मागणी करत आहे तर ऐकायचं तर ऐका नाहीतर नका ऐकू असंही बीएस ठाकूर मे प्रगती कंट्रक्शन ला सांगत आहे पण पुढील काम करून द्या उरलेले २५ कोटी देतो असंही बोलत असल्याचे समजते छत्रपती संभाजी नगर येथील एमजीपीचे विभागीय कार्यालय मुख्य अधिकारी मनिषा पलांडे व दीपक कोळी यांनी काही दिवसापूर्वी बीड शहरांमध्ये दीपक कोळी यांनी अमृत अटल योजनेचा आढावा घेतलेला आहे यामध्ये मात्र योजना समस्त फेल गेली असल्याचेही बोलले जात आहे त्यामुळे आता ३६६ कोटीच्या २५ योजना असतील किंवा अमृत अटल ची १२७ कोटी योजना असेल व एमजीपी कार्यालय बीडच्या छोटे-मोठे काम असतील किंवा शासकीय कार्यालयातील खर्च असेल यामध्ये गजानन खराटे व अकाउंटंट ठाकूर हे एक रुपया असेल किंवा एक लाख असतील ५०००० असतील असे छोटे मोठे खर्च म्हणून चेक द्वारे निधी काढून आपला छोटा मोठा खर्च दाखवून एमजीपी कार्यालय संत गतीने लुटत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे याचीही सफल चौकशी होणे आहे परंतु चेक एक नेमकं कशामुळे काढतात कारण एमजीपी कार्यालय फक्त लुटण्यासाठीच आहे का असावा सवाल नागरिकांकडून होत आहे त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीडच्या प्रभारी पदावरून गजानन खराटे यांची या पदावरून उचल बांगडी होण्याची माहिती विश्वसनी सूत्रांनी दैनिक महाराष्ट्र आरंभला दिलेली आहे.कर्मचारी दोशी आढळलेले आहेत गुत्तेदारांना काळे यादीमध्ये टाकण्यात आलेला आहे यामध्ये मुकुंद आंधळे या अधिकाऱ्याने अनेक गुत्तेदारी करणाऱ्या गुत्तेदारांना राजकीय नेत्यांना व वादग्रस्त भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांचे चौकशीचा अहवाल विरोधात पाठविल्यामुळे मुकुंद आंधळे चा जलजीवन चा १८०० कोटीचा चार्ज काढण्यासाठी काही अधिकारी कर्मचारी हे वंजारी मराठा समाजातील असून ते बजरंग सोनवणे संदीप क्षीरसागर सुरेश धस यांची हुजरेगिरी करत आहेत आणि मुकुंद आंधळे ला हटवून आपल्यावर लागलेले आरोप हे पुसून टाकण्यासाठी गजानन खराटे चा माध्यमातून आपल्याला स्वतःला क्लीन चीट देण्यासाठी गजानन खराटेला जलजीवन चा चार्ज देऊन आंधळ्याची खुर्ची रिकामी करण्याच्या तयारीत आहेत. अशी चर्चा एमजीपी कार्यालय व जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयातील गुत्तेदार अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये दबक्या आवाजामध्ये रात्रीच्या वेळी चाललेल्या दारूच्या पार्टीमध्ये बियर बार असेल किंवा धाबा त्या ठिकाणी संबंधित प्रकरणावरती चर्चा चालल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिलेली आहे.

# अनंत कराड यांना आदर्श साहित्यिक पुरस्कार प्रदान

शिरूर कासार (प्रशांत बाफना) : एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, जेष्ठ साहित्यिक अनंत कराड यांना तहसीलदार वैशाली पाटील (आष्टी), ह.भ.प.बहिरवाळ महाराज (मदन महाराज देवस्थान) यांच्या हस्ते स्व.मैनुद्दीन शेख आदर्श साहित्यिक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते स्व.मैनुद्दीन शेख यांच्या स्मरणार्थ कडा येथे आदर्श साहित्यिक, शिक्षक, पत्रकार, डॉक्टर तसेच, गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

साहित्यिक कराड यांची 'काळ्याई', अंदमानचा प्रवास', 'मनीच्या कविता' आणि 'हे




रामा..' ही चार पुस्तके प्रकाशित झालेली असून गेल्या अनेक वर्षांपासून ते शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक आणि पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरापासून ग्रामीण, तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय आणि विश्व साहित्य संमेलनांतून त्यांनी सहभाग नोंदवला असून आजपर्यंत अनेक मानाचे पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन आदर्श शिक्षिका तथा कवयित्री नजमा शेख यांनी आपल्या वडीलांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारा प्रतिष्ठेचा स्व.मैनुद्दीन शेख पुरस्कार साहित्यिक कराड यांना जाहीर केला. कराड यांच्यासह पत्रकार तथा दै.झुंजारनेता चे उपसंपादक उत्तम बोडखे, आदर्श शिक्षक, कवी राजेंद्र लाड आदी दहा मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अनंत कराड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या सर्व पदाधिकाऱ्यांसह, सभासद आणि कार्यकर्ते, तसेच मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर चे सर्व पदाधिकारी, विविध शिक्षक संघटना आणि तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विक्रेत्यांचे आंदोलन विजयी!

## लॉटरी बंदीचा निर्णय अखेर मागे घेतला!

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य लॉटरी च्या बंदीचा निर्णय अखेर मागे घेण्यात आला असून नव्या सोडतीची छपाई लवकरच सुरू होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरी तोटयात आहे म्हणून मार्च २०२५ नंतर छपाईचे काम थांबविण्यात आले होते त्यामुळे लाखों विक्रेते व त्यांचे कुटुंबिय यांच्यावर बेरोजगारीची टांगती तलवार होती. अखेर विक्रेत्या संघटनेने केलेल्या पध्दतशीर आंदोलनामुळे सरकारला लॉटरी बंदीचा निर्णय रद्द करावा लागला.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, शिवसेना नेते श्री उध्दवजी ठाकरे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते, अंबादास दानवे यांची भेट घेऊन संघटनेने लॉटरी वाचविण्यासाठी मागणी केली. प्रशासनाने सोयीचा अर्थ लावून आकडे फुगविले आहेत हे आकडेवारीच्या आधारे मांडले होते. दादर येथे लॉटरी विक्रेत्यांचा लॉटरी



बचाव मेळावा तसेच पत्रकार परिषदा यातूनही सरकारचे लक्ष हे वेधण्यात आले होते. लॉटरीची छपाई ही परराज्यात होते त्यामुळे तिकिटे विलंबाने मिळतात. ही छपाई राज्यातच करावी अशी ही मागणी विक्रेत्यांचे नेते सातार्डेकर यानी केली होती. त्याला ही मान्यता मिळाल्याचे समजते. लॉटरीला अभय दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार संघटनेतर्फे मानण्यात आले आहे.हा विजय लॉटरी विक्रेत्यांचा आहे ! एकजुटीचा आहे! अशी प्रतिक्रिया संघटनेचे युवा अध्यक्ष श्री. सुमित सातार्डेकर सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, मुंबई अध्यक्ष विनोद गाडेकर, ठाणे जिल्हाध्यक्ष महेश कोळी यानी व्यक्त केली आहे. लॉटरी ट्रेड एजेंट एसोसिएशन /रोजगार बचाओ समिती नी ही या मागणीसाठी पाठपुरावा केला होता.




माननीय अनिल चांदणे यांची भाजप अनुसूचित मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. सोबत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैया क्षीरसागर. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग बबनराव वाघमारे. उपाध्यक्ष मिलिंद ठोकळ. श्याम माने सर. कैलास आव्हाड

# मृत्युंजय कादंबरी देऊन सरस्वती बुक हाऊसमध्ये सुरेश साळुंकेंचा गौरव

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंकेंचे

विविध वैवाहिक आणि सांस्कृतिक समारंभातले निवेदन हे आशयपुर्ण आणि रसाळ पूर्ण असते म्हणून निवेदक सुरेश साळुंके यांनी निवेदनासारख्या प्रगल्भ क्षेत्रांमध्ये अभिजात दर्जा आसलेल्या मराठी भाषेत निवेदन करुन भारतीय संस्कृतीचे सांस्कृतिक मूल्य सांगत सनातन धर्माबद्दल आवर्जून बोलत जनजागृती करतात.म्हणून बीड येथील सरस्वती विद्या डेपोचे अतुलजी तरळकल यांनी सुरेश साळुंकेंना मराठी भाषेतील सुप्रसिद्ध लेखक शिवाजी सावंत यांच्या प्रतिभाकोषात निर्माण झालेले ज्ञानपीठ मूर्ती पुरस्कार विजेती मृत्युंजय ही कादंबरी सप्रेम भेट देऊन



अभिनंदन केले आहे. निवेदक सुरेश साळुंकेंच्या निवेदन प्रेमातून अतुलजींनी मृत्युंजय कादंबरी ही देऊन अभिनंदन केल्याच्या प्रित्यार्थ बोलताना निवेदक सुरेश साळुंखे म्हणाले की मराठी भाषेला अभिजात दर्जा भेटला त्या मराठी भाषेचा राजमुकुट आसलेली मृत्युंजय कादंबरी आपणास निवेदनाबद्दल सप्रेम भेट मिळते हि परेहुनी पर्ते गोष्ट आहे. कारण मृत्युंजय हि कादंबरी प्रतिभेचा मृत्युंजयी स्त्रोत आहे. सरस्वती बुक हाऊसचे संचालक अतुलजी यांनी दिलेली मृत्युंजय कादंबरी हि साक्षात सरस्वती देवीचा प्रसाद आहे. कारण मृत्युंजय मधील प्रत्येक अक्षरांमधुन प्रतिभेचा अस्खलित मराठी सुगंध दरवळतो. म्हणून अभिनंदन करण्यासाठी मृत्युंजय ही दिलेली कादंबरी माझ्या आयुष्यातील एका वळणदार वळणावरची तहाणलेल्यासाठी अमृतपान करणारी अमृतपोई आहे. मराठी भाषेतून निवेदन करून अभिजात दर्जा उंचावत जावा म्हणून सातत्याने प्रयत्न करणाऱ्या सुरेश साळुंकेंचा मृत्युंजय कादंबरी देऊन अभिनंदन केल्याबद्दल धार्मिक अध्यात्मिक सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कौतुक होत आहे.

# मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड येथे माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न

माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती इतर शहरापेक्षा मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी विशेष आणि वेगळ्या पद्धतीची असते. मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रमाई महिला मंडळ या मंडळाच्या कार्यकर्त्या,, आणि भारतीय बौद्ध महासभा मध्ये सक्रिय काम करणाऱ्या या महिला प्रत्येक वर्षी माता रमाईची जयंती एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करतात. या जयंतीच्या निमित्त महिला वर्गांना प्रभावित आणि प्रेरित करण्यासाठी ,,विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येतं. दिनांक ०६.०२.२०२५ रोजी महिलांच्या विविध संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेलं होतं.. यामध्ये संगीत खुर्ची लिंबू चमचा,, फुगडी,, तळ्यात मळ्यात व विविध स्पर्धे प्रकारच्या गीत गायन स्पर्धा आयोजित करून महिलांना प्रभावित करण्यात आले.. ज्या महिला या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवतील ,,उत्कृष्ट प्राविण्य मिळवतील त्यांना बक्षीस म्हणून साडीचे वाटप करण्यात आले. त्यामुळे परिसरातील जवळपास सर्वच महिला या जयंतीच्या उपक्रमामध्ये तन-मनाने सहभाग नोंदवला.. या जयंतीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने सदरील कार्यक्रमाचे ध्वजारोहण नगराध्यक्ष जगताप मॅडम ,,वडवणी पोलीस स्टेशनचे ए पी आय सन्माननीय अमन शिरसाट सर ,व अनेक मान्यवर मंडळीच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. दिनांक सात फेब्रुवारी २०२५ रोजी माता रमाई यांच्या प्रतिमेचं पूजन करून,, माता रमाई ची प्रतिमा संपूर्ण वडवणी शहरांमध्ये मिरवणूक काढून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने ,वडवणी शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील ,,बौद्ध उपासक उपासिका यांना भोजन दानाची व्यवस्था केलेली होती. अनेक मान्यवर मंडळींनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपापले विचार मांडले.. मान्यवर मंडळींचा या ठिकाणी सर्व भीम नगर वाशी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या उपक्रमामध्ये वडवणी कर ,,अगदी आनंदी झालेले होते. माता रमाईच्या जयंतीच्या निमित्ताने मुलींनी लेझीम पथकामध्ये सहभाग नोंदवला.. अतिशय उल्हासित वातावरणामध्ये मिरवणूक काढण्यात आली.. व जल्लोषपूर्ण




वातावरणामध्ये सायंकाळी सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भीम नगर मधील सर्वच महिला मंडळी बौद्ध उपासक उपासिका यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



# परळीच्या शिरपेचात आणखीन एक तुरा इंजि.राजू जगतकर दुबई येथे निवड

परळी ।प्रतिनिधी

परळीचे भूमिपुत्र इंजि. राजू श्रावणराव जगतकर, अपर्णा जगतकर,व संपादक बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू ज्यांची दुबई येथे बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी निवड झाली. त्यांनी दिल्ली व मुंबई येथे वेगवेगळ्या पदावर मेट्रो रेल्वेचे काम पाहिले आहे. अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून मुंबई मेट्रो येथे काम करण्यासाठी प्रेरित केले आहे. ते येत्या १४ फेब्रुवारी रोजी दुबई येथे प्रत्यक्ष कामावर रुजू होत आहेत. त्यांची निवड झाल्याबद्दल मित्र परिवार व आप्त स्वकीयांकडून सत्कार व विदेशात जाणार आहेत, त्यानिमित्ताने निरोप समारंभ प्रसंगी शाल श्रीफळ पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन परळी समाचार चे संपादक आत्मलिंग शेटे, राजेश साखरे सहशिक्षक वैद्यनाथ विद्यालय, रामकिशन सावंत, प्रमोद सावंत, श्रावणराव जगतकर, बालाजी जगतकर सिद्धार्थ जगतकर आदी दिसत आहेत.

# वारकरी कीर्तनकारांनो खालील गोष्टींसाठी नाही म्हणायला शिका

समाजसेवक विधाते दादा सर

बीड ।प्रतिनिधी

कीर्तनासाठी पाकीट मानधन सांगायला नाही म्हणा. प्रवासाचा खर्च सोडून वर दिलेली रक्कम नाही म्हणा.. स्वतःची पाद्यपूजा करून घ्यायला नाही म्हणा. स्वतःची आरती करून घ्यायला नाही म्हणा. कीर्तनात पुष्पवृष्टी करून घ्यायला नाही म्हणा. कीर्तनात एक संयोजकांच्या हार सोडून इतर हार घालून घ्यायला नाही म्हणा. कीर्तनात संत विरहित काव्यरचना म्हणायला नाही म्हणा. स्वागतासाठी रथ दिंड्या घेवून आलेल्या लोकांना नाही म्हणा. सप्रेम भेट म्हणून आलेली उंची वस्त्रे, ऐशारामाच्या वस्तू याना नाही म्हणा. वीना टाळ पखवाज सोडून इतर वाद्यांना नाही म्हणा. गरजेपुरता लाऊड स्पीकर वापरा गरज नसेल तर त्याला नाही म्हणा. मोठाल्या साऊंड सिस्टिम त्याला नाही म्हणा. देवासमोर पाठ करून कीर्तन करायला नाही म्हणा. राजकीय स्वार्थासाठी राजकीय लोकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला नाही म्हणा. जुगलबंदी सारखे स्पर्धात्मक कार्यक्रम करायला नाही म्हणा. जातीयवादी कार्यक्रमात कीर्तन करायला नाही म्हणा.वारी मध्ये कीर्तन करायला एकही रुपया घेण्यास नाही म्हणा क्षेत्रामध्ये कीर्तन करण्यास मानधनास नाही म्हणा. स्वतःच लावणाऱ्या पदव्याना नाही म्हणा. प्रायोजित कार्यक्रमाला नाही म्हणा.डोक्यावर छत्र्या, पालख्या सारखे राजोपचार करून घ्यायला नाही म्हणा. लोकाग्रहास्तव एकाच अभंगावर कीर्तन करायला नाही म्हणा.सांप्रदायिक नियम सोडून कीर्तन करण्यास नाही म्हणा. संत मर्यादांचे उल्लंघन



करण्यास सांगणाऱ्यांना नाही म्हणा. जेसीबी लावून फुल उधळून घेण्यास नाही म्हणा. मोठाले मंडप टाकण्यास नाही म्हणा. कीर्तनासाठी किर्तन वेदी पर्यंत घोड्यावर बसण्यास नाही म्हणा. अति मिष्टान्न खाण्यास नाही म्हणा. मुक्कामा करायचं झाल्यास गाद्यागिरीद्या नाही (शक्यतो तरुण कीर्तनकार)नाही म्हणा. तरुण स्त्री संपर्क नाही म्हणा.उगाचच मोठाले बॅनर स्वतःच्या फोटोची कट आउट करून घेण्यास नाही म्हणा रात्रीचा प्रवास करून कीर्तनासाठी येण्यास नाही म्हणा.पाच मिनिटाच्या वर कीर्तनात चाल म्हणणाऱ्या गायकाला नाही म्हणा. उगाचच आलापी करणाऱ्या व कीर्तनाचा वेळ घेणाऱ्या गायक नाही म्हणागायक व पखवाजे टाळकरी यांना मानधन देण्यास सांगायला नाही म्हणा. हे नियम जर पाळले तर लोकांचा तुमच्यावर विश्वास वाढेल. कीर्तनाची परंपरा टिकेल. आणि तुमचा निश्चित सन्मान राहील.

# बीडमध्ये आ.संदीप क्षीरसागरांकडून बंधारा कम पुल जागेची पाहणी

## तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ

शाहूनगर येथील रस्ता कामासह विविध ठिकाणच्या विकास कामांची केली पाहणी

बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वतः उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली. बीड शहरातील तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.



सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

# कोल्हापूर जिल्हा बहुजन समता पार्टी ची लवकरच नवीन कार्यकारिणी करणार-डॉ.विजय चांदणे

कोल्हापूर ।प्रतिनिधी

कोल्हापूर सर्किट हाऊस येथे शुक्रवारी दि.०७/०२/२०२५ रोजी बहुजन समता पार्टी चे वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते... यावेळी ✽माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले........! बैठकीच्या अध्यक्षस्थानी बहुजन समता पार्टी चे राज्य उपाध्यक्ष मा.डॉ.विजय चांदणे उपस्थित होते..

यावेळी डॉ विजय चांदणे मार्गदर्शन करताना म्हणाले...दलित महासंघ आणि बहुजन समता पार्टी ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत... समाजाचं राजकीय प्रबोधन झाले पाहिजे... नेमकं राजकारण कसं करायचं... राजकारण म्हणजे काय ह्या गोष्टी समाजात रुजविण्यासाठी डॉ मच्छिंद्र सकटे यांनी बहुजन समता पार्टी ची स्थापना केली आहे... परंतु दहा वर्षे झाली म्हणावं तसं काम झालं नाही...अशा परिस्थितीत डॉ मच्छिंद्र सकटे यांनी मला आवाहन केले की.. बहुजन समता पार्टी ची बांधणी मजबूत करण्यासाठी आणि पार्टी चा विस्तार व प्रचार करण्यासाठी.. एकत्र येऊन बहुजन समता पार्टी चे काम करुया... ज्याप्रमाणे दलित महासंघाच्या वाढीसाठी ज्या पद्धतीने जडणघडण केली..त्याच धर्तीवर बहुजन समता पार्टी चे काम सुद्धा त्याच ताकदीने उभा करण्यासाठी मी ... बहुजन समता पार्टी मध्ये प्रवेश केला आहे.. आणि राज्य उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे... आणि येणाऱ्या काही काळामध्ये दलित महासंघाचे पुढे एक पाऊल जाऊन बहुजन समता पार्टी चा संपूर्ण महाराष्ट्रात दबदबा निश्चितच निर्माण होईल...! त्यासाठी आपण सर्वांनी मिळून बहुजन समता पार्टी च्या माध्यमातून सर्व जाती धर्मातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि राजकीय पातळीवर सर्व सामान्य जनतेचा विकास करण्यासाठीच इथून पुढच्या काळात गतीमान आणि आक्रमक पणे काम करण्याची तयारी करणं आवश्यक आहे...आणी त्यासाठी लवकरच कोल्हापूर जिल्हा ची संपूर्ण कार्यकारिणी बदलून ... सक्षमपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य



त्या पदावर काम करण्याची संधी देण्यात येणार आहे... अनेक सक्षम कार्यकर्ते बहुजन समता पार्टी मध्ये प्रवेश करत आहेत..त्या सर्वांना योग्य ती संधी नक्कीच देणार... आणि बहुजन समता पार्टी चे काम गतिमान करणार.

डॉ विजय चांदणे यांची बहुजन समता पार्टी च्या राज्य उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल कोल्हापूर जिल्हा चे वतीने मा.आप्पासाहेब कांबळे (बहुजन समता पार्टी... जिल्हा सरचिटणीस) ,मा.सागर बुरुड (जिल्हा कार्याध्यक्ष)व मा.अभिजीत अवघडे(जिल्हा नेते) यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला..

यावेळी ... दलित महासंघाचे करवीर तालुका अध्यक्ष मा.अनिल मिसाळ, समतावादी महासंघाचे प.महा.उपाध्यक्ष मा. भानुदास बल्लाळ,डी.पी.आय.चे जिल्हा अध्यक्ष मा.दादासो माने,मा.राजू बिरांजे, प्रशांत उर्फ बंडा अवघडे,मा.नितीन बिरांजे,(राजारामपुरी), दलित महासंघाचे जिल्हा संघटक मा.बाबासो अवघडे,मोहन बोराडे(गांधीनगर), अभीजित अवघडे,अर्जुन बुचडे(राजारामपुरी), सचिन घाटगे(वडणगे), राजू कांबळे, हितेश सचदेव, अनिल हेगडे, सचिन कोरे(हुपरी), अविनाश भैया परकारे(हुपरी), सुरेश कांबळे (कोपार्डे ) नाथाजी वाकरेकर (माजनाळ) दिलीप यादव (सांगरुळ) अमर दबडे (पेठ वडगांव) नितीन घाटगे (कागल),सौ.भारती लोहार,सौ दिपाली लोहार (इचलकरंजी) व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे संयोजन मा.आप्पासाहेब कांबळे व मा.सागर बुरुड यांनी केले.. शेवटी आभार मा.अभिजीत अवघडे यांनी केले.



## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की यांच्या वाढदिवसानिमित्त आशादत्त गोशाळेत चारा वाटप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाड्याच्या बँकिंग क्षेत्रात सातत्यपूर्ण उल्लेखनीय कामगिरी करीत नांवारूपास आलेल्या दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की यांच्या वाढदिवसानिमित्त आशादत्त गोशाळेत चारा वाटप करण्यात आला.

ऍड.मकरंद पत्की व त्यांच्या सहकाऱ्यांनी अंबाजोगाई येथील आशादत्त गोशाळेतील गुरांना चारा वाटप करून गोमाता रक्षण व संगोपन करण्याचा आपल्या वाढदिवसानिमित्त विधायक संदेश दिला. मितभाषी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वदूर ओळखले जाणारे ऍड.पत्की हे विधी, सहकार, समाजसेवा आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. यावेळी दीनदयाळ बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर तसेच बँकेचे कर्मचारी स्वप्निल सिद्धांत्ती, वल्लभ उमनवार, अजय पांडे, इंद्रजीत आघाव, अभिमन्यू वैष्णव आदींसह मित्र परिवार उपस्थित होता. अतिशय चांगल्या संकल्पनेतून गाईंना चारा देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

## महाराष्ट्र आरंभ इफेक्ट..

# अखेर ७ महिन्यानंतर जिल्हा रुग्णालयाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभाल व स्वच्छता करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी नकार दिला होता.प्रशासन देखील हे काम कर्मचाऱ्यांना करायला लावण्यास धजावत नव्हते त्यामुळे मागील ७ महिन्यांपासून स्वच्छतागृह कुलुपबंद होते. परीणामी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आंतररूग्ण विभागात दाखल रूग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक तसेच सोनोग्राफी करण्यासाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला असा दररोज हजारो लोकांचा रूग्णालयात राबता असतो.मात्र जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे ? असा प्रश्न पडला होता त्यामुळे शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत होती. त्यामुळे नागरीकांची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने सार्वजनिक स्वच्छतागृहे खुले करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना लेखी निवेदनाद्वारे केली होती.अखेर याची दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या आदेशाने जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले असुन येथीलच कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे काम देण्यात आले



आहे. यामुळे नागरीकांची विशेषतः महिलांची होणारी हेळसांड थांबली आहे.

जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे.आता माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह बांधण्यात आलेले आहे. लवकरच त्याचाही वापर सुरू करण्यात येईल असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.

# तरुणांनी उद्योग व्यवसायात येवून प्रगती करावी - माजी राज्यमंत्री शिवाजीराव दादा पंडीत

## हॉटेल श्रीकृष्ण फॅमिली रेस्टॉरंटचे उद्घाटन थाटात संपन्न ; संत महंतांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

गेवराई ।प्रतिनिधी

सध्या अनेक तरुण सुशिक्षीत बेरोजगार आहेत. स्पर्धेच्या युगात सध्या प्रत्येकाला नौकरी मिळणं कठीण आहे. त्यामुळे तरुणांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता उद्योग व्यवसाय येवून आपली प्रगती केली पाहिजे. आपण इनामे इतबारे काम केले तर प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.तर कदम परिवाराने जिद्द, चिकाटी, आणि अथक परिश्रमातून हॉटेल व्यवसायात नावलौकिक प्राप्त केले असून संत- महंतांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे हॉटेल व्यवसायात त्यांना शंभर टक्के यश आहे.असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री तथा शिक्षण व सहकार महर्षी शिवाजीराव दादा पंडीत यांनी व्यक्त केले.

गेवराई शहरापासून काही अंतरावर असलेल्या बीड - संभाजीनगर हायवे जवळ, शेवगाव फाटा उमापुर रोड, गेवराई येथे हॉटेल श्रीकृष्ण फॅमिली रेस्टॉरंट या शुध्द शाकाहारी प्युअर व्हेज दालनाचा भव्य शुभारंभ संत- महंतांसह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला. यावेळी शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर श्रीक्षेत्र पांचाळेश्वरचे महंत दर्यापुरकर बाबा , श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता म. गिरी, श्रीक्षेत्र पांचाळेश्वरचे महंत गुर्जर बाबा , ह.भ.प.नामदेव म.शेकटेकर, ह.भ.प अर्जुन महाराज, भवानी बँकेचे चेअरमन पापा मोटे उपस्थित होते. दरम्यान उद्घाटनानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, आमदार विजयसिंहराजे पंडित, शिवसेना नेते राजेंद्र बेदरे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, युवा नेते रोहित पंडित, माजी उपनगराध्यक्ष महेश दाभाडे, सतिषदादा



दाभाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

पुढे बोलताना माजी राज्यमंत्री शिवाजीराव दादा पंडीत म्हणाले की, गेवराई तालुका फार भाग्यवान आहे या तालुक्याची आता प्रगतीच्या दिशेने वाटचाल असून विविध विकास कामे आता मार्गी लागणार आहेत. आपण पंडित कुटुंबास भरभरुन प्रेम दिलं मी आपल्या कायम ऋणात राहील. धोंडराई रोडला ही वास्तु उभारली ही ग्राहकांच्या सोयीसाठी चांगली गोष्ट आहे. कदम परिवाराने व्यापार क्षेत्रात येऊन स्वतःच्या विकासाचा निर्धार करून बबन कदम व अशोक कदम यांनी ही हॉटेल सुरु केली. ही वास्तु सर्व सुविधायुक्त आहे. व्यवसाय म्हणलं की क्वालिटी आली आणि ती क्वालिटी यांच्याकडे आहे. गेवराई शहरात असे सर्वसोयी सुविधायुक्त हॉटेल नव्हते परंतु हॉटेल श्रीकृष्णच्या माध्यमातून सर्व सोयी सुविधा येथे उपलब्ध आहेत.हे शुद्ध शाकाहारी हॉटेल असून खूप चालणार आहे. संत- महंतांचे आशीर्वाद आणि पंडित कुटुंबीयांची साथ त्यांच्या पाठीशी आहे आणि कदम परिवार हे हॉटेल सार्थकी नेऊन चालवतील अशा सदिच्छा अन् शुभेच्छाही शेवटी बोलताना त्यांनी दिल्या. यावेळी दत्ता महाराज गिरी, महंत गुर्जर बाबा यांनी अर्शिवादपर मनोगत व्यक्त करुन शुभाशीर्वाद दिले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, पत्रकार, डॉक्टर, व्यापारी, शिक्षक, इंजिनिअर, वकील , शेतकरी, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे बबनराव कदम, अशोकराव कदम, गंगाधर कदम, इंजी डिंगाबर हाकाळे, शुभम कदम, चक्रधर कदम, अवधूत कदम यांनी स्वागत केले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सुनिल मुंडे तर आभारप्रदर्शन पत्रकार विनोद पौळ यांनी व्यक्त केले.

हॉटेल व्यवसायात कदम परिवाराची पंचवीस वर्षांची अखंड परंपरा कायम...

हॉटेल व्यवसायात पंचवीस वर्षांची अखंड परंपरा कायम ठेवून कदम परिवाराने हॉटेल श्रीकृष्णची दुसरी शाखा सुरु केली आहे. अथक परिश्रम, जिद्द व चिकाटी च्या जोरावर त्यांनी हा व्यवसाय चालवला व तो टिकवलाही हे त्यांचे सर्वात मोठे यश आहे यानंतर त्यांनी गेवराई शहरापासून जवळच एक आगळी वेगळी वास्तु निर्माण करुन ग्राहकांच्या सोयीसाठी सर्व सुविधा युक्त व आकर्षित असे शेवगाव फाटा, उमापुर रोड येथे हॉटेल श्रीकृष्ण ची दुसरी शाखा सुरु केली आहे. या भव्य दालनाचा भव्य शुभारंभ गणेश जयंतीच्या शुभ मुहूर्तावर संपन्न झाला आहे. तरी एक वेळेस आवश्य भेट देवून कदम परिवारास सेवेची संधी द्यावी अशी विनंती कदम परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.

# यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे-पो.नि.शिवाजी बंटेवाड

## विद्यार्थ्यांनी चांगले विचार आत्मसात करावेत- प्रा.केशव भांगे



नवगण राजुरी ।प्रतिनिधी

देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात युवक महत्वपुर्ण भुमिका बजावू शकतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना गुणवत्तानुरूप शिक्षण दिले गेलेच पाहिजे. यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे असे प्रतिपादन बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी नवगण राजुरी येथील गजानन विद्यालयात इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी बोलतांना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य केशव भांगे हे होते.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.केशव भांगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पो.नि.शिवाजी बंटेवाड हे होते. यावेळी पुढे बोलतांना पो.नि.बंटेवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तीमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मुल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते. शाळेत मिळणार्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्याला शाळेत पाठवणे हे पालकांचे कर्तव्य आहे, उध्दीष्ट साध्य करायचे असेल तर संयम, चिकाटी हे महत्वाचे माध्यम आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना प्राचार्य केशव भांगे म्हणाले की, देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भुमिका लक्षात घेऊन शिक्षण विषयक कार्यक्रम राबविले जातात. मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो तो तितकाच यशाच्या शिखरावर जावून बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारासाठी महत्वाची असते, आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने चांगले विचार आत्मसात करावेत. आपले उध्दीष्ट साध्य करावे असे सांगून इयत्ता १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय इयत्ता १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी, शाळेचे उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले एस.बी. सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संगिता शिंदे यांनी तर सुत्रसंचालन जयदिप सरवदे यांनी केले. शेवटी माणिक अनुसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राखेच्या अवैध वाहतुकीवर प्रतिबंध घालावा

## पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

बीड ।प्रतिनिधी

वीट भट्यासाठी मोकळया हायवामधून होणारी अवैध वाहतुकीमुळे प्रदुषण वाढत असून याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे तसेच खाली सांडलेल्या राखेमुळे वातवरणीय बदल रोखण्यासाठी बदं हायवामधून ही वाहतूक होईल याकडे संबधितांनी लक्ष घालून तसा अहवाल सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रगती सभागृहात जिल्हयातील अवैध वाळू व तत्सम गौण खनिज उत्खणनामुळे होणारा पर्यावरणाचा -हास, बीड जिल्हयातील अवैध डोंगर पोखरल्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी तसेच औष्णिक वीज प्रकल्प, परळी येथे होणा-या राखेच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदुषण या बैठकी प्रसंगी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या.चमणीपासूनचे प्रदुषण नियत्रंणात असले तरी राख उचलणे हे संबधित अधिका-यांचे दायित्व आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. राखेचे अनाधिकृत साठे सील करावेत. वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, राखेची वाहतुक मुख्य रस्त्यांवरून न करता ती बाह्य मार्ग अर्थात बायपास द्वारे करावी. दाऊतपूर एरियामध्ये किती राख आहे. याचे रेकार्ड ठेवणे राखेचा साठा आजमितीला आहे तेवढाच पुढील तपासणीपर्यंत असायला हवा नसता संबधितावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही याप्रसंगी श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

वाळू,दगड,माती,मुरुम, इतर खडी याची अवैध वाहतूक करणा-या किती लोकांवर कारवाई केली तसेच वाळू घाटांची संख्या किती. जप्त केलेली वाळू ही पंडीत दिन दयाळ




उपाध्याय घरकूल योजनेसाठी वापरावी. गौण खणिजाचे अवैध उत्खणनावर प्रतिबंध घालावा असेही यावेळी श्रीमती मुंडे म्हणाल्या.

डोंगराचे अवैध उत्खनन करणाऱ्यांना दंड करावा, दर ३ महिन्याला याचा अहवाल सादर करावा. डोंगराखाली होणारी प्लॉटींग अवैध असल्यास त्यावर प्रतिबंध घालावा. डोंगर पोखरल्यामुळे खाली राहणा-या कुंटूबावर दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. असेही त्या यावेळी म्हणाल्या या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्रीमती मुंडे यांना पावर पॉइंट प्रेझेंटेशन व्दारे माहिती देण्यात आली बैठकीचे प्रास्ताविक आभार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मानले.

# परीक्षा केंद्रावर हत्यारबंद बंदोबस्त द्या, अन्यथा आमचा संतोष देशमुख होईल

## १२ वी परीक्षेदरम्यान उपप्राचार्यांना भीती

प्रतिनिधी । परभणी

परभणी : राज्यातील १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी कसोटीचा काळ जवळ आला असून पुढील काही दिवसांत परीक्षांना सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभाग कामाला लागला असून कॉपीमुक्त अभियानासाठी प्रशासनाने कंबर कसल्याचे पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे कॉपीमुक्त परीक्षेसाठी संवदेनशील केंद्रांवर ड्रोनद्वारे करडी नजर ठेवली जाणार आहे. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा दरम्यान संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोनद्वारे जिल्हा प्रशासनाचे लक्ष असणार आहे. बोर्ड परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनाकडून



व्हिडिओ चित्रीकरणही केलं जाणार आहे. प्रशासनाकडून त्या दृष्टीने तयारी सुरू असून शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, उपप्राचार्य व स्टाफ कार्यरत झाला आहे. तत्पूर्वी प्रशासनाला एका महाविद्यालयातील प्राचार्यांनी हत्यारबंद पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी केली आहे. अन्यथा आमचा संतोष देशमुख होईल, अशी भिती त्यांनी व्यक्त केली आहे.

अवघ्या ४ दिवसांवर बारावीची परीक्षा आली आणि याच अनुषंगाने राबविण्यात येत असलेल्या कॉपीमुक्त अभियानावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परभणीतील ज्ञानोपासक महाविद्यालयाचे उपप्राचार्य विजय घोडके यांनी आम्हाला कॉपीमुक्त अभियान राबवायचं आहे. केंद्र संचालक म्हणून ज्या सेंटरवर जायचे आहे, तिथे हत्यारबंद बंदोबस्त द्या अन्यथा आमचा संतोष देशमुख होऊ शकतो अशी भीती त्यांनी व्यक्त केलीय. घोडके यांच्या या वक्तव्यामुळे परीक्षा केंद्रावरील शिक्षक आणि केंद्रप्रमुखांवर देखील किती मोठा दबाव असतो, त्यांनाही किती भीती असते याचा अंदाज लावता येईल.

छत्रपती संभाजी नगर येथे विभागीय शिक्षण मंडळात परभणी, हिंगोली, बीड, जालना आणि संभाजीनगर या ५ जिल्ह्यातील बारावी परीक्षांच्या केंद्र संचालकांची बैठक पार पडली आहे. या बैठकीत मंडळाच्या सचिव वैशाली जामदार यांच्यासमोर घोडके यांनी हा विषय मांडला. घोडके यांनी व्यक्त केलेल्या भीतीमुळे परीक्षा केंद्रावरही कशाप्रकारे दहशत पसरवली जाते, कशारितीने गुंडगिरी दाखवली जाते याचा अंदाज बांधता येईल. दरम्यान, परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला असतो, पण पोलिसांचा हा बंदोबस्त हत्यारबंद पोलिसांचा असावा अशी मागणी जोर धरत आहेत. कारण,

# शेतरस्त्याचा सर्वे करून महसुली अभिलेखात नोंदनी करावी - शिवराम राऊत

शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगाचे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन

शिरूर ।प्रतिनिधी

मौजे हिवरसिंगा सज्जा अंतर्गत प्रचलित व सद्यस्थितीत वापरातील वहिवाटीत असणारे पायवाट, गाडीवाट,शेतरस्ते,पांदन रस्ते,नंबर बांध रस्ते,शीव रस्ते,इतर जोडरस्ते,या मधील बहुतेक रस्त्यांची नोंद



महसुली अभिलेख,तलाठी यांचे अभिलेख,भूमी अभिलेख मधील गाव नकाशे या मध्ये नोंद आढळून येत नाही.तसेच यामधील बहुतेक रस्ते पूर्वापार आहेत,परंतू त्यांची जायमोका पाहणी व त्यांची नोंद अभिलेखात नाही.त्यामुळे अनेक ठिकाणी शेतक-यांना अनेक समस्या येत आहेत.शेती औजारे,बियाणे-खते,शेतमाल वाहतुक करणे यावेळी विविध समस्यांना सामना करावा लागत आहे.

# जिल्हा परिषदेच्या शाळांना ईमारत बांधकाम, शाळा दुरुस्ती, वीजपुरवठा, स्वच्छतागृहे या पायाभूत सुविधांसाठी निधी द्या

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था झाली असुन या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आज दि.७ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीच्या निमित्ताने आलेल्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा संपर्क मंत्री बीड जिल्हा ना.पंकजाताई मुंडे यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.





# खासदार संसद औद्योकीय महोत्सव २०२५

प्रतिनिधी । नागपुर

आज खासदार आणि केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित खासदार औद्योगिक महोत्सव विदर्भातील औद्योगिक विकासाला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल आहे या योजनेचे श्रेय विदर्भाचे सुपुत्र माननीय नितीनजी गडकरी साहेब यांना आहे व मंचावर उपस्थित महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस साहेब व महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजयजी राठोड साहेब व मंत्रिमंडळातील अन्य मान्यवर हे देखील उपस्थित होते.

या दोन्ही नेत्यांनी नागपूरला तसेच विदर्भाला आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून दिली आहे विद्युत भाषेचे पाणी जंगलांनी खनिज संपत्तीने समृद्ध असा परिसर आहे नागपूरच्या विकासामुळे आणि येथील पायाभूत सुविधामुळे देश विदेशातील विविध उद्योजक विदर्भात येऊ पाहत आहे. नागपूरच्या परिसरातील बुटीबोरी वैद्योगिक क्षेत्र हे भारतातील सर्वात मोठ्या औद्योगिक वसाहतीपैकी एक आहे या महोत्सवामुळे विदर्भात उद्योग येण्यास अधिक चांगला मिळेल तसेच कॉटन सिटी यवतमाळ मधील कापूस गडचिरोलीतील खनिज चंद्रपूर वणी मधील कोळसा यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराची संधी विदर्भाला मिळणे आहे असे दिसून येत आहे....!

# मनात जिद्द, चिकाटी व परिश्रम करण्याची तयारी ठेवल्यास निश्चित यशाचे शिखर गाठता येते -बाबासाहेब गोंटे

## किनगाव येथील जिजामाता विद्यालयात निरोप समारंभाप्रसंगी बोलताना

प्रतिनिधी । अंबड

अंबड प्रतिनिधी :- दि.७ शुक्रवार रोजी किनगाव येथील जिजामाता विद्यालयात निरोप समारंभात बोलताना विद्यार्थी मित्रांनो मनात जिद्द,चिकाटी, परिश्रम करण्याची तयारी ठेवल्यास निश्चित आपल्याला उभ्या आयुष्यात यशाचे शिखर गाठता येते.यासाठी प्रत्येकांनी आत्मविश्वास जगायाला हवा. असे आवाहन प्रसिध्द व्याख्याते व अंबडच्या मत्स्योदरीचे शिक्षक बाबासाहेब गोंटे यांनी तालुक्यातील किनगाव येथील जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (ता.७) इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी बोलताना प्रमूख वक्ते बाबासाहेब गोंटे यांनी बोलताना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कैलास मुके, निंबाळकर , संजय येळवंते, गणेश तागड, संजय उके, दत्ता राऊत, विष्णु इप्पर, कैलास मांटे, प्रा. संगीता तांगडे, प्रा.सारिका आवारे, प्रा.श्रध्दा गायकवाड यांची प्रमूख उपस्थिती होती. पुढे बोलताना बाबासाहेब गोंटे म्हणाले की,जीवनात विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे काळाची गरज बनली आहे. यासाठी वाचन, लेखन याचे कौशल्य विकसित करायला हवे. जगाच्या घडामोडी जाणून घेताना वर्तमान पत्र, सामान्य ज्ञानावर आधारीत पुस्तके, साहित्याचे वाचन करुण जगाच्या घडामोडी वर लक्ष केंद्रित करायला हवेत. यातूनच आपल्याला स्पर्धा परिक्षेत घवघवीत यश संपादन करता येऊ शकते. यासाठी त्या दिशेने वाटचाल करायला हवी. असे आवाहन प्रसिध्द व्याख्याते बाबासाहेब गोंटे यांनी बोलताना केले. याप्रसंगी कार्यक्रमाला रमेश प्रा.गाढे, प्रा राजेंद्र

पाटील, प्रा. महादू चव्हाण, प्रा. रवींद्र राजपूत, प्रा.रवींद्र भुसारे,भानुदास नन्नवरे, प्रल्हाद वाघसह विद्यार्थी, पालक मोठ्या




संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संतोष भोजने यांनी तर आभारप्रदर्शन दत्ता राऊत यांनी मानले.

# लग्नाचा बस्ता बांधण्या साठी निघालेल्या बोलेरो गाडीचा सांगवी सारणी पाटीजवळ अपघात

## नवरी मुलीच्या वडिलांसह दोन ठार,नऊ जखमी

प्रतिनिधी । केज

दि.७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार रोजी कासारी येथील कुटुंब लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी अहिल्यानगरला जात असताना बोलेरो गाडीला टेम्पोने धडक दिल्याने सांगवी पाटीजवळ असणाऱ्या पुलावर सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.अपघातात नवरी मुलीचे वडील व नातेवाईक महिलेचा मृत्यू झाला.व इतर तीन जण गंभीर रित्या जखमी तर सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत.याबाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कासारी येथील रामेश्वर शाहूराव डोईफोडे यांच्या मुलीचे दि.२२ फेब्रुवारी रोजी लग्न होते.त्या अनुषंगाने लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी डोईफोडे कुटुंब व इतर नातेवाईक अहिल्यानगर कडे निघाले होते.केज मांजरसुंबा रोड वरील सांगवीसारणी पाटी जवळ पुलाच्या पुढील वळणावर बोलेरो जीप व टेम्पोचा अपघात झाला.



या अपघातात मुलीचे वडील रामेश्वर डोईफोडे व नातेवाईक उर्मिला श्रीराम घुले(कोरेगाव) यांचा मृत्यू झाला.तसेच चालक अजय डोईफोडे,लक्ष्मण डोईफोडे,उत्तम डोईफोडे, राम डोईफोडे,प्रवीण डोईफोडे यांच्यासह अन्य चार जण जखमी झाले आहेत.लग्न घरातील नवरी मुलीच्या वडिलांसह नातेवाईक महिलेचा मृत्यू झाल्याने डोईफोडे कुटुंबा वर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.तसेच सर्व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खासदार डॉ.कल्याण काळे आक्रमक

## केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांना दिले निवेदन

प्रतिनिधी । जालना

महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांचा कापूस अजूनही घरात पडून आहे, कारण भारतीय कापूस महामंडळ (उउख) कडून खरेदी केंद्रे अनियमितरित्या चालवली जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात कापूस विकावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांची भेट घेऊन तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.खासदार काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांकडून अजूनही ५०% पेक्षा अधिक कापूस विकला गेलेला नाही, आणि अशा परिस्थितीत उउख ची खरेदी केंद्रे बंद करणे हे अन्यायकारक आहे. केंद्र सरकारने कापूस खरेदी प्रक्रिया अखेरच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत सुरू ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

सध्या खाजगी व्यापारी उउख पेक्षा कमी दर देऊन शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सरकारी हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

सरकारकडून त्वरित निर्णयाची अपेक्षा

या संदर्भात केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी या मुद्द्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी उउख ची खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचा आणि व्यापाऱ्यांच्या मनमानीला आळा घालण्याचा विचार केंद्र सरकार करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि त्यांच्या कापसाला न्याय मिळावा, यासाठी खासदार काळे यांचे प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# उम्मेहानी मुक्तार शेख यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

## जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान

प्रतिनिधी । बीड

वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षापासून अबॅकस शिकवण्यामध्ये तरबेज झालेल्या उम्मेहानी मुक्तार शेख यांच्या बुद्धी कौशल्याची चुणूक लक्षात घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

बीड येथील बालपिर नगर रोड येथील रहिवासी असलेल्या उम्मेहानी मुख्तार शेख यांनी वयाच्या तेराव्या वर्षापासून म्हणजे सन २०१८ पासून विद्यार्थ्यांना अबॅकसचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. तेव्हा त्या अवघ्या आठवी वर्गामध्ये शिकत होत्या. अबॅकस हा फक्त व्यवसाय म्हणून नाही तर समाजसेवा म्हणून त्यांनी हे काम हाती घेतले. इतर महिलांना देखील प्रशिक्षण देऊन त्यांनी आपल्या स्वतःचे अबॅकस क्लासेस सुरू करण्याची संधी इतर मुलींना महिलांना देखील उपलब्ध करून दिली आहे देत आहेत. फक्त बीडच नव्हे तर मुंबई पुणे छत्रपती संभाजी नगर लातूर धाराशिव या जिल्ह्यात देखील आणि ग्रामीण भागात देखील त्यांनी ऑनलाईन क्लासेस सुरू केलेले आहेत. या ऑनलाइन क्लासेसला आता थेट दुबईचे विद्यार्थी देखील प्रशिक्षण घेत आहेत. त्यांनी शिक्षकांचे प्रशिक्षणही दिले असून छत्रपती संभाजी नगर लातूर येथे फ्रेंचायासी देखील सुरू केल्या आहेत.



सन २०२१ या वार्षिक बेस्ट टीचर ऑफ द इयर या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवण्यात देखील आलेले आहे. सन २०२४ मध्ये उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार पद्मश्री श्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. गोरगरीब मुलींसाठी फीस मध्ये खास सवलत दिली जात असून काही विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार त्यांना मोफत प्रशिक्षण त्या देत आहेत. इंटरनॅशनल लेवलला सहभाग नोंदवून अनेक पुरस्कार त्यांनी प्राप्त केलेले आहेत. आत्ताच पुणे येथे अबॅकस इंटरनॅशनल ऑफलाइन परीक्षा पार पडल्या. या परीक्षेमध्ये उम्मेहानी यांनी आपल्या २४ विद्यार्थ्यांना सहभाग घेऊन संधी दिली होती. या परीक्षेमध्ये १४ विद्यार्थी टॉपर आले होते. त्यांच्या या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट वेगळ्या कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जगावेगळे वेगळेपण जपणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी संपर्क करावा - शेख आयेशा

ज्या महिलांनी शून्यातून विश्व निर्माण करत आपले अस्तित्व उभा केले आहे. अशा यशस्वी महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असणाऱ्या मुलींनी, महिलांनी आपल्या कार्य अहवालासह तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ यानंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT